# आता मिशन भुयारी मेट्रो !

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्ग लवकरच सुरू होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बृहन्मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान करणाऱ्या आणि मुंबईकरांचा दैनंदिन प्रवास वेगवान करणाऱ्या मेट्रो रेल्वे मार्गिका २ 'अ' आणि ७ या पूर्णतः सुरू झाल्या असून, आता सरकारचे लक्ष कुलाबा - वांद्रे - सीप्झ या देशातील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रोकडे लागले आहे. भुयारी मेट्रोच्या चाचणीनंतर आता याचवर्षी म्हणजे २०२३ मध्ये मेट्रो ३ चा पहिला टप्पा सुरू करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत.

कुलाबा - वांद्रे - सीप्झ या मेट्रो ३ ही मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर - दक्षिण जोडणारी भूमिगत मार्गिका आहे. या मार्गिकेवरील बीकेसी स्थानक ते धारावीदरम्यानचा मार्ग मिठी नदीखालून जाणार आहे. त्यासाठी मिठी नदीखालील आकर्षक असा भुयारी मेट्रो मार्ग पूर्णपणे तयार झाला आहे. मेट्रो ३ या राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका आहे. मेट्रोच्या आरे कारशेडला विलंब झाल्यामुळे ही मार्गिका पूर्ण होण्यास वर्षभराचा विलंब झाला. मात्र, सध्या या मार्गिकेचे काम वेगाने सुरू आहे. डिसेंबरमध्ये या मार्गिकेचा पहिला टप्पा सुरू होणार आहे. त्यानुसार मार्गिकेचे भुयारीकरण १०० टक्के काम पूर्ण झाले आहे.



कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भूयारी मेट्रो प्रकल्पाचे १०० टक्के भूयारीकरण पूर्ण झाले आहे.

### मेट्रो १

वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर या मार्गावर धावणाऱ्या मेट्रोच्या फेऱ्या आणखी १८ने वाढविण्यात आल्या असून, आता दिवसभरातील फेऱ्यांची संख्या ३९८ झाली आहे.

### मेट्रो २ 'ब'

मेट्रो २ 'ब'च्या कामाचा वेग प्राधिकरणाने वाढविला आहे. वांद्रे, कुर्ला या टप्प्यातील कामानेदेखील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

### मेट्रो २ 'अ'

दहिसर पूर्व ते डीएननगर, ६४१० कोटी रुपयांची १८.६ किमी मार्गिका असून, १७ स्थानकांचा यामध्ये समावेश आहे.



### मेट्रो ४

वडाळा - कासारवडवली मेट्रो ४चे काम वेगाने सुरू असून, भांडुप-मुलुंडमधील काम प्रगतीपथावर आहे. मेट्रो ४ सोबत कुर्ला येथे मेट्रो २ 'ब' जोडली जाईल.

### मेट्रो ५

ठाणे - भिवंडी - कल्याण या मेट्रो ५ च्या मार्गिकेतील ठाणे ते भिवंडीदरम्यान १२.७ किमीचा पहिला टप्पा प्रगतीपथावर आहे. ६ उन्नत स्थानके असणार आहेत.

### मेट्रो ६

पूर्व आणि उपनगराला जोडणाऱ्या मेट्रो मार्गाचे ६ चे काम वेगाने सुरू असून, आतापर्यंत या मार्गाचे काम ६६ टक्के पूर्ण झाल्याचा दावा प्राधिकरणाने केला आहे.

### मेट्रो ७

अंधेरी पूर्व - दहिसर पूर्व ही ६,२०८ कोटी खर्च करून बांधण्यात आली आहे. १६.५ किमी मार्गिका आहे.

### मेट्रो ९

मेट्रो ९ हा मार्ग मीरा - भाईंदरसोबत जोडेल. १०.०८ किमीचा हा मार्ग ८ उन्नत आहे.